# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक २१/०२/२०१७

*जिल्हयात दुसऱ्या टप्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांततेत पार*

- *नक्षलविरोधी अभियाना दरम्यान २ जहाल नक्षल अटक*:

**विशेष अभियान पथकाची कामगीरी**

गडचिरोली जिल्हयात दुसऱ्या टप्प्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. दुसऱ्या टप्यात एकूण सर्व पोलीस व पोलिंग पाटर्या सुरक्षितपणे पोलीस स्टेशनला परतल्या. दुसऱ्या टप्यात उपविभाग पेंढरी, अहेरी, एटापल्ली, भामरागड, जिमलगट्टा व सिरोंचा अशा एकुण ०६ उपविभांगामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदानाकरीता संवेदनशील तसेच अतिसंवेदनशील अशा एकूण २८६ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया घेण्यात आली. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. एकुण ७०% पर्यंत मतदान झाल्याचा प्राथमीक अंदाज आहे.

अशा तऱ्हेने नक्षलांचे वर्चस्व असलेल्या विभागांमध्ये निवडणूका शांततेत पार पडल्या.

- *स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पातागुडम गावामध्ये निवडणूक*

गडचिरोली जिल्हयाच्या सिरोंच्या तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलदृष्टया अतिसंवेदनशील असलेल्या मौजा पातागुडम येथे यापूर्वी कोणत्याही प्रकारच्या निवडणूकी दरम्यान मतदान केंद्र नव्हते. पातागुडम येथील मतदान केंद्र हे सुरक्षेच्या कारणास्तव नेहमी मौजा सोमनपल्ली येथे हलविण्यात येत होते. एका वर्षापुर्वी स्थापन झालेला पोलीस मदत केंद्र पातागुडमने परिसरात

नक्षल्यांचा प्रभाव मिटवत या भागात परिवर्तनाची लाट निर्माण केली. यामुळे आज झालेल्या निवडणूकांचे मतदान केंद्र पातागुडम येथे घेण्यात आले. मागील वर्षी २९/०२/२०१६ रोजी पोलीस मदत केंद्र पातागुडम स्थापन करण्यात आले. छत्तीसगड सीमेवर असणारा पातागुडम परिसर म्हणजे नक्षल्यांचा येण्या-जाण्याचा मार्ग. त्यामुळे परिसरातील लोकांना नक्षल्यांची दहशत होती. मात्र पोमके स्थापनेपासूनच पातागुडम पोलीसांनी नक्षल्यांचे सर्व वाईट मनसुबे उधळून लावत सोबतच विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य करत नागरीकांची मने जिंकली. नक्षलप्रभावित जनतेच्या मनात पोलीसांचे स्थान दृढ करुन विश्वास संपादन केला. नक्षलविरोधी अभियानसोबतच विविध स्पर्धा, मेळावे, महाराष्ट्र दर्शन सहल आयोजन, दळणवळणाची साधने उपलब्ध करुन देणे यातून पोलीसांनी जनमानसांना जवळ केले व ग्रामसभा, ग्रामपंचायत यांचे महत्व जनसंपर्क बैठकांमध्ये पटवून दिले व त्यामुळे लोकांनी आज मतदानाच्या रुपाने लोकशाहीतून विकासाची कास धरली. आज मौजा पातागुडम येथे एकुण ७१. ३९% मतदान झाले.

- ***<u>नक्षलविरोधी अभियाना दरम्यान २ जहाल नक्षल्यांना अटक</u>***

आज विशेष अभियान पथक उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके कोटमी हद्दित मौजा रेकनार जंगल परीसरात नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना पथकाला ४ अनोळखी इसम साध्या वेषात संशयीत रित्या आढळून आले. पोलीसांना पाहताच त्या चौघांनी सदर ठिकाणाहून पळ काढला. पोलीसांनी पाठलाग करुन त्यापैकी दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्या दोघांची चौकशी केली असता त्यांनी आपला परिचय सांगितला. निलेश पोटावी, प्लाटून नं. ०३ सदस्य व अजित पुडो, कसनसुर एलओएस सदस्य अशी त्यांची नावे आहेत. या दोघांचा एटापल्ली व धानोरा तालुक्यात घडलेल्या खुन, चकमकी, जाळपोळ, काळे झेंडे फडकाविणे अशा बऱ्याच गुन्हयांमध्ये सहभाग आहे. या दोघांना पोलीस पथकाने अटक केली आहे.




ARMANI